# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.10.2024** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज व्हिएंटयन इथं 19व्या पूर्व आशिया शिखर परिषदेत सहभागी होणार
2. 2016-17 ते 2021-22 या आर्थिक वर्षात ग्रामीण कुटुंबांच्या सरासरी मासिक उत्पन्नात 57 टक्क्यांनी वाढ झाल्याचा नाबार्डचा अहवाल
3. नॉन क्रिमिलेयर मर्यादा 8 लाखांवरुन 15 लाख करण्याची शिफारस केंद्र सरकारला करायचा महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
4. ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांना भावपूर्ण वातावरणात अखेरचा निरोप, मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार आणि
5. देशाच्या विविध भागात येत्या 2 दिवसात मुसळधार पावसाचा इशारा

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज लाओ पीपल्स डेमोक्रेटिक रिपब्लिकची राजधानी व्हिएंटियन इथं 19व्या पूर्व आशिया शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. जगभरातल्या विविध देशांच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या परिषदेत, परस्परांमध्ये धोरणात्मक विश्वासाचं वातावरण तयार करण्यावर तसंच सहभागी देशांमधील प्रादेशिक महत्त्वाच्या मुद्दयावर भर दिला जातो. तत्पूर्वी काल त्यांनी व्हिएंटियन इथं भारत-आसियान शिखर परिषदेला संबोधित केलं. भारताच्या act east धोरणामुळे आसियान देशांबरोबरच्या संबंधांना नवी ऊर्जा, गती आणि दिशा मिळाल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. 21वं शतक भारत आणि आसियान देशांचं शतक आहे, भारत आणि आसियान देश शांतताप्रिय राष्ट्र आहेत आणि ही राष्ट्र एकमेकांच्या राष्ट्रीय अखंडतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर करतात असं त्यांनी सांगितलं. जगाच्या अनेक भागांमध्ये संघर्ष आणि तणाव निर्माण होत असताना भारत आणि आसियानमधील मैत्री, सहकार्य, संवाद आणि भागीदारी ही खूप महत्त्वाची असल्याचं मोदी म्हणाले. भारत आणि आसियान देशांमधील संबंधांचं महत्त्व अधोरेखित करताना मोदी यांनी, गेल्या 10 वर्षांत आसियान प्रदेशातील व्यापार दुपटीने वाढून 130 अब्ज डॉलर्स झाल्याचं सांगितलं. यावेळी पंतप्रधानांनी भारत - आसियान देशांमधील संबंध अधिक मजबूत करण्यासाठी 10 कलमी योजना जाहीर केली.

**<u>भारत-आसियान सागरी सुरक्षा</u>**

आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार, विवादांचं शांततापूर्ण निराकरण करण्यासाठी आणि सागरी सुरक्षा राखण्यासाठी शांती आणि स्थिरतेला प्रोत्साहन देण्यावर भारत आणि आसियान राष्ट्रांनी भर दिला आहे. भारत आणि असियान देशांच्या संयुक्त निवेदनात याबाबत सहमति दर्शवण्यात आली आहे. सागरी सुरक्षा, दहशतवादाला विरोध, सायबर सुरक्षा, आंतरराष्ट्रीय गुन्हे, संरक्षण उद्योग, मानवतेसाठी मदत आणि आपत्ती निवारण, शांतता आणि आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उपायांसाठी सहकार्य करण्यावर भारत आणि आसियान देशांनी सहमती दर्शविली आहे.

**<u>नाबार्ड</u>**

2016-17 ते 2021-22 या आर्थिक वर्षात ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न 57 टक्क्यांनी वाढलं आहे. नाबार्डच्या सर्वेक्षणात ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. त्यानुसार, 2016-17 मध्ये ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न 8 हजार 59 रुपये होतं; ते 2021-22 मध्ये 12 हजार 698 रुपयांपर्यंत वाढलं आहे. ग्रामीण भागातील कुटुंबांचा मासिक खर्चही 6 हजार 600 रुपयांवरून 11 हजार 200 रुपयांवर गेला आहे; तसंच या कुटुंबांकडून होणारी आर्थिक बचतही वाढली आहे. भारतातील ग्रामीण कुटुंबांमधील विमा संरक्षणामध्येही लक्षणीय वाढ झाल्याचं दिसून आलं आहे. सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार,

किमान एक सदस्य विमा धारक असलेल्या कुटुंबांचं  प्रमाण 25 टक्क्यांवरून 80 टक्क्यांच्या वर गेलं आहे. ग्रामीण शेतकऱ्यांमध्ये आर्थिक समावेश वाढवण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड महत्त्वाचं असून पेन्शन धारक कुटुंबांची टक्केवारी 19 टक्क्यांवरून साडे तेवीस टक्के झाली आहे. दरम्यान, थकीत कर्ज असलेल्या कुटुंबांचं प्रमाणही 2016-17 मधल्या 47 टक्क्यांवरून 2021-22 मध्ये ते 52 टक्क्यांपर्यंत वाढलं आहे.

**दुर्गापूजा**

देशभरात नवरात्रोत्सवाच्या निमित्तानं आदिशक्तीचा जागर सुरू आहे. आजच्या दुर्गापूजेनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. देवी दुर्गेला शौर्याचं प्रतीक मानलं जातं आणि म्हणूनच दुर्गा पूजा ही वाईटावर चांगल्याचा विजय म्हणून साजरी केली जाते. या निमित्तानं महिलांना अत्यंत आदरानं वागवलं जाईल, असा संवेदनशील आणि न्याय्य समाज निर्माण व्हावा अशी प्रार्थना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केली आहे.

**बालिका दिन**

जगभर आज आंतरराष्ट्रीय बालिका दिन साजरा केला जात आहे. लैंगिक समानता, याबाबतचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी हा दिन साजरा केला जातो.

**गाझा लेबनॉन हल्ले**

गाझा पट्टीतील एका शाळेवर काल झालेल्या इस्रायलच्या हवाई हल्ल्यात किमान 28 जणांचा मृत्यू तर 54 जण जखमी झाले आहेत. पॅलेस्टिनी रेड क्रिसेंटच्या म्हणण्यानुसार, या हल्ल्यात विस्थापित कुटुंबांनी आश्रय घेतलेल्या देर अल-बालाह इथल्या रुफैदा अल-अस्लामिया शाळेला लक्ष्य करण्यात आलं होतं. हे 2 वेगवेगळे हवाई हल्ले शाळेतल्या अन्न साठवलेल्या खोल्यांवर झाले. दरम्यान लेबनॉनमधील मध्य बेरूतमधील 2 दाट लोकवस्तीच्या परिसरात झालेल्या इस्रायली हल्ल्यात 22 जणांचा मृत्यू तर 117 जण जखमी झाले आहेत.

**मंत्रीमंडळ**

नॉन क्रिमिलेयरची मर्यादा 8 लाखांवरुन 15 लाख करण्याची शिफारस केंद्र सरकारला करायचा निर्णय काल महाराष्ट्र राज्य मंत्री मंडळानं घेतला. तसंच शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी, लोहार, नाथपंथीय समाज, आणि पत्रकार तसंच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी महामंडळं स्थापन करण्याचा निर्णयही मंत्रीमंडळाच्या बैठकीत काल घेण्यात आला. मौलाना आझाद महामंडळाच्या भागभांडवलात, तसंच मदरश्यांमधल्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. राज्यात आंतरराष्ट्रीय रोजगार आणि कौशल्य विकास कंपनी स्थापन करणं, तीन नव्या खासगी विद्यापीठांना मान्यता, कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापन करायलाही मंत्रीमंडळाची मान्यता मिळाली.

**कोलकाता निषेध**

आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयामध्ये झालेल्या सहकारी डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येच्या विरोधात कोलकाता इथे आमरण उपोषणात सहभागी झालेल्या 7 कनिष्ठ डॉक्टरांपैकी एकाची प्रकृती बिघडल्यामुळे काल रात्री त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अनिकेत महतो असं या डॉक्टरांचं नाव आहे. शनिवारपासून विविध वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयातील 6 कनिष्ठ डॉक्टरांनी आमरण उपोषण सुरू केलं होतं यात रविवारी महातो सहभागी झाले होते.

**कोकेन**

दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने दोन हजार कोटी रुपये किमतीचं 200 किलो कोकेन जप्त केलं आहे. पश्चिम दिल्लीतील रमेश नगर परिसरातून हे कोकेन जप्त करण्यात आल्याची माहिती दिल्ली पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. दिल्ली पोलिसांनी गेल्या आठवड्यात 500 किलो कोकेन जप्त केलं होतं. पोलिसांनी या सर्व प्रकरणात आतापर्यंत 7 आरोपींना अटक केली आहे.

**रतन टाटा-अंत्यसंस्कार**

ज्येष्ठ उद्योगपती, टाटा सन्सचे मानद अध्यक्ष आणि टाटा ट्रस्टचे अध्यक्ष रतन टाटा यांना काल भावपूर्ण वातावरणात अखेरचा निरोप देण्यात आला. मुंबईत वरळी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री पियूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. तत्पूर्वी काल सकाळी टाटा यांचं पार्थिव शरीर एन सी पी ए इथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार, सुप्रिया सुळे, प्रफुल्ल पटेल, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास; अनेक उद्योगपती, टाटा समूहाच्या विविध कंपन्यांचे अधिकारी आणि कर्मचारी, तसंच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक व्यक्तींनी टाटा यांचं अंत्यदर्शन घेऊन त्यांना आदरांजली वाहिली.

**महिला T-20**

महिलांच्या ICC T20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल रात्री शारजा इथं झालेल्या सामन्यात वेस्ट इंडिजने बांगलादेशचा 8 खेळाडू राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत बांगलादेशने 20 षटकांत 8 खेळाडू बाद 103 धावा केल्या. बांगलादेशकडून कर्णधार निगार सुलतानाने 44 चेंडूत 39 धावा केल्या. वेस्ट इंडिजच्या करिश्मा रामहरकने बांगलादेशचे 4 गडी बाद केले. आज अ गटात, गतविजेत्या ऑस्ट्रेलिया संघाचा सामना पाकिस्तान महिला संघाबरोबर - दुबई मध्ये होईल.

**IMD**

येत्या 2 दिवसांत तामिळनाडू, पुडुचेरी, कराईकल, अरुणाचल प्रदेश आणि गुजरातमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पुढील 2 दिवसांत गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि बिहारच्या काही भागांतून नैऋत्य मौसमी पाऊस माघारी जाण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.